# एक कप चहासाठी!

दोन अंकी नाटक

**लेखक:  प्रल्हाद जाधव**

पात्र संयोजन:
सुधीर पटवर्धन (३०)
सीमा पटवर्धन (२५)
बाळासाहेब खिलारे-पाटील (५०)
दत्ता सोनवणे (४०)
अण्णासाहेब झुंजुर्डे-पाटील (३५)
बजरंग लोखंडे (४५)
शिवाय कार्यकर्ते, कर्मचारी, पत्रकार...
(ज्यांना नावे दिलेली नाहीत अशा भूमिकांना एक, दोन, तीन, चार,पाच... असे क्रमांक दिले आहेत. )

अंक पहिला / प्रवेश पहिला

(पडदा उघडतो. सगळे कलवंत हात जोडून नांदीवजा गाणे म्हणत आहेत.)

सर्व :
साधे-सोपे नाटक अमुचे साधे-सोपे गाणे
सत्य शिवाचे पूजक आम्ही सुंदर हे जगणे...

नाही रुपांतर वा भाषांतर, नाही केली चोरी,
परकियांच्या कथानकाची नाही उचलेगिरी
अस्सल देशी व्यथा मांडली, अस्सल देशी नाणे
सत्य शिवाचे पूजक आम्ही सुंदर हे जगणे...

तुमचे अमुचे प्रश्न सारखे घरा-घरातील ऐसे
जळात राहून माशापाशी वैर धरावे कैसे?
कसे जगावे, कसे मरावे, व्यर्थ रोज धावणे;
सत्य शिवाचे पूजक आम्ही सुंदर हे जगणे...

हासत-खेळत दोन घडीचे जोडू ऐसे नाते
नवीन आशय देऊन जाईल अपुल्या जगण्याला ते
रंजन थोडे, भंजन थोडे, थोडे वेडे होणे
सत्य शिवाचे पूजक आम्ही सुंदर हे जगणे...

(अंधार. प्रकाश. घर. सुधीर पेपर वाचत आहे. पत्नीला हाका मारू लागतो.)

सुधीर : ऐकलंस का? अगं एऽऽऽ? (स्वतःशी) गेली कुठं म्हणायची ही सकाळी-सकाळी! (आणखी मोठ्याने) अगं ऐकलंस का?
सीमा : (आतूनच) आले - आले, थांबा जरा, काय हवंय एवढं?
सुधीर : दुसरं काय? चहा घेऊन ये एक कप फर्स्टक्लास!
सीमा : (बाहेर येत) काय म्हणालात?
सुधीर : दुसरं काय म्हणणार सकाळी सकाळी? चऽ हा ऽऽ
सीमा : दूध नाही घरात; चहा हवा असेल तर आधी बाहेर जा आणि दूध घेऊन या!
सुधीर : अरेरे - अरेरे! इतकी छान सकाळ... पेपर वाचायला इतका छान मूड लागलेला आणि समोर (नमस्कार करीत) अशी रसिक मंडळी जमलेली असताना हे हतभागी स्त्रिये, तू मला दूध आणायला पाठवतेस?

सीमा : (प्रेक्षकाना नमस्कार करत) नमस्कार मंडळी! माफ करा हं, माझं तुमच्याकडं लक्षच नव्हतं. आणि मला सांगा–

सुधीर : (तिला अडवत) ए बाई, उगाच लांबण लावत बसू नकोस. जा आणि जेवढं असेल तेवढ्यात कर, जा!

सीमा : सांगितलं ना, एक थेंबसुद्धा नाही घरात दुधाचा!

सुधीर : शासनाच्या दुग्धव्यवसाय विभागात अधिकारी म्हणून काम करणाऱ्या माणसाच्या घरात दुधाचा थेंबदेखील नाही यावर  विश्वास ठेवेल का कोणी?

सीमा : अहो खरंच नाही. अगदी नाही, नाही, नाही!

सुधीर : याचा अर्थ काय होतो माहिताय का?

सीमा : काय?

सुधीर : पौर्णिमा असून आकाशात...

सीमा : चंद्र नाही.

सुधीर : एकादशी असून मराठी माणसाच्या घरात...

सीमा : साबुदाण्याची खिचडी नाही.

सुधीर : पक्षांतर केलं तरी...

सीमा : मंत्रीपद नाही.

सुधीर : अगं, असं कधी होईल का?

सीमा : अगदी तुमच्या गळ्याची शपथ, अहो, दूधच आलं नाही गेल्या दोन-तीन दिवसापासून.

सुधीर : काहीतरी घोटाळा झालेला दिसतोय. म्हणजे, पुरेसं दूध जमा झालेलं नसणार...

सीमा : काय पुरेसं दूध जमा झालेलं नसणार? 'म. टा.' वाचलात ना आजचा?

सुधीर : काय म्हणालीस?

सीमा : (त्याच्याच हातातला पेपर ओढून घेऊन त्यालाच दाखवत) म.टा... महाराष्ट्र टाईम्स' (देत) हा घ्या. बघा. बघा. वाचा. दूध समुद्रात ओतून टाकल्याची बातमी!

सुधीर : (बातमी पहात) बातमी आहे खरी पण कुठल्यातरी नवशिक्या बातमीदारानं दिलेली दिसतेय ती. ‘अंदरकी बात’ माहीत नाही त्याला.

सीमा : आणि मग सोबत हा फोटो छापलाय दूध समुद्रात ओतून टाकत असतानाचा, त्याचं काय?

सुधीर : तेच सांगतोय मी; ते दूध नाही तर 'व्हे' आहे, 'व्हे'!

सीमा : व्हे?

सुधीर : 'डब्ल्यू एच ई वाय' - व्हे म्हणजे 'स्निग्धांश विरहित शुभ्र द्रवपदार्थ!

सीमा : काय काय काय काय?

सुधीर : स्निग्धांश विरहित शुभ्र द्रवपदार्थ!

सीमा : तुमचं हे मराठी जर त्या चिपळूणकरानी ऐकलं असतं ना तर इंग्रजीऐवजी मराठीलाच वाघिणीचं दूध म्हणण्याचा प्रघात पाडला असता त्यानी. तुम्हा सरकारी अधिकाऱ्यांना कधी साध्यासोप्या भाषेत बोलताच येत नाही का हो? घरातसुद्धा जीआर वाचत असल्यासारखं बोलताय.

सुधीर : अगं, दह्याचा चक्का करताना जे पाणी काढून टाकतात ना त्याला 'व्हे' असं म्हणतात.

सीमा : आता कसं बोललात! पण अग्रलेख वाचलात का? महाराष्ट्रात अनेक ठिकाणी टँकरच्या टँकर दूध रस्त्यावर ओतून टाकलं जातंय असं म्हटलंय त्यात, खोटं आहे का ते? इकडं आम्हाला चहासाठी दूध नाही आणि तिकडं मारे रस्त्यावर फेकून देताहेत!

सुधीर : अगं कधी कधी काय होतं की दूध साठवण्यासाठी पुरेसे कॅन्स मिळत नाहीत. मग अशावेळी ते रस्त्यावर ओतून टाकण्याशिवाय दुसरा मार्ग रहात नाही.

सीमा : कॅन्स मिळत नाहीत? आणि म्हणून दूध रस्त्यावर ओतून टाकायचं? काय अर्थ आहे या बोलण्याला?

सुधीर : पुरेसे कॅन्स असतात ग. पण ते तुपात अडकून पडले की दूध रस्त्यावर फेकून द्यावं लागतं मग.

सीमा : मग तुपासाठी वेगळ्या कॅन्सची व्यवस्था नाही का करता येत तुम्हाला? शुद्ध बावळटपणा आहे हा!

सुधीर : माझे आई, तुला कळायच्या नाहीत आमच्या भानगडी! त्यापेक्षा मी बाहेर जातो आणि एखाद्या खाजगी कंपनीचं दूध घेऊन येतो.

सीमा : आता कसे आलात वळणावर? (एकदम) अरे हो पण आज दुकानं बंद आहेत सगळी.

सुधीर : खरंच की, आज भारत बंद; नाही का?

सीमा : नेहमीची कटकट आहे मेली, आज हे बंद, उद्या ते बंद! आज याचा संप उद्या त्याचा संप. आज याचा मोर्चा उद्या त्याचा मोर्चा... काय करावं आता?

सुधीर : आपण एखादी गाय पाळूया का घरी?

सीमा : काय?

सुधीर : गाय पाळू या का– नाही तर म्हैस एखादी?

सीमा : मग तिच्यासोबत एखादा भैय्यासुद्धा आणावा लागेल सोबत...

सुधीर : भैय्या, कशाला?

सीमा : दूध कोण काढणार मग रोज रोज?

सुधीर : हो, खरंच आहे तेही.

सीमा : आणि जर भैय्या आणला तर त्याला रोज स्वच्छ आंघोळ घालावी लागेल ते आणखी वेगळंच... आणि त्याच्या अंगाचा मळ काढायचा म्हणजे तर आपल्याला एखादा खास साबण तयार करून घ्यावा लागेल. (जणू जाहिरात करत) भैय्याच्याही अंगाचा मळ काढणारा खास साबणऽऽऽ (धक्का देत) लक्स सुप्रीम!

सुधीर : (हसत) अगं हे काय? सिनेतारका कुठं - भैय्या कुठं? त्या दोघांची कांती 'सेम टू सेम' वाटली की काय? (दोघेही हसतात.)

सीमा : अती झालं नि हसू आलं!

सुधीर : हे बघ तुला दूध मिळालं की झालं ना, दोन मिनीटात आणतो!

सीमा : अहो पण दुकानं बंद आहेत सगळी!

सुधीर : हो, पण मथुरेचा बाजार तर बंद नाही ना?

सीमा : मथुरेचा बाजार?

सुधीर : हो, मथुरेचा बाजार!

(ढोलकी वाजू लागते. प्रकाश बदलू लागतो...)

सीमा : (लयीत)

नव्या युगाची नवी देणगी, पोटाची चिंता,
कुठली युमना, कुठल्या गोपी, कुठले गोकुळ आता?
सुधीर : (लयीत)
दुधा-तुपाची कुठली चंगळ, कुठले लोणी आता?
कुठले गोधन, कुठली पुण्ये, कुठले सतयुग आता?
सीमा : (पुन्हा गद्यात) अगं आता गवळणींच्या जागी टेम्पो आणि माठाच्या जागी कॅन्स् आलेत दुधाचे–
सुधीर : (पुन्हा गद्यात) त्या खरेदी-विक्रीतही भ्रष्टाचार!
सीमा : अगदी बरोबर!
(पुन्हा प्रकाशाची उघडझाप. प्रकाश पूर्ववत.)
सीमा : किती कॅन गायब झाले हो तुमच्या त्या दूधसंघातनं?
सुधीर : पाच हजार.
सीमा : अरे बापरे!
सुधीर : (प्रेक्षकांना) पाच हजार कॅन म्हणजे जवळपास पस्तीस लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाला बरं का मंडळी!
सीमा : दोन वर्ष झाली असतील ना त्या प्रकाराला?
सुधीर : त्याहून जास्त.
सीमा : (त्याला) मग काय झालं त्या चौकशीचं पुढं?
सुधीर : चाललीय रखडत रखडत... जाऊदे, कशाला सकाळी सकाळी त्या 'रम्य' आठवणी काढतेस?
सीमा : आठवणी म्हटलं की फ्लॅशबॅकमध्ये जावंच लागतं!
सुधीर : म्हणजे? काय म्हणणं आहे तुझं नेमकं?
सीमा : (हसत) अहो, आठवणीं काढायच्या तर फ्लॅशबॅकमध्ये नाही का जावं लागणार?
सुधीर : (त्याच्या लक्षात येतं.) ओके ओके आलं लक्षात!
सीमा : चला! रेडी? वन, टू, थ्री! (प्रेक्षकांकडे पाहात जाहीर करते) फ्लॅशबॅक!

(अंधार. प्रकाश बदललेला. लावणी कानी पडते.)

बुगडी माझी सांडली गऽऽऽ
जाता सातार्‍याला ग जाता सातार्‍याला...
चुगली नका सांगू गऽऽऽ माझ्या–
सुधीर : ("हो हो!" करत समेवर लावणी थांबवतो आणि प्रेक्षकांना) मंडळी! व्हेटर्नरी डॉक्टर झाल्या झाल्या मी एमपीएस्सीच्या परीक्षेला बसलो आणि सुदैवाने लगेच मला शासनाच्या दुग्धव्यवसाय विभागात राजपत्रित अधिकारी म्हणून नोकरी लागली. नोकरीत कन्फर्म झाल्यावर दोन वर्षांनी आमच्या खात्यानं मला एका अतिशय ॲक्टिव्ह अशा सहकारी क्षेत्रात– म्हणजे जिथलं कॅन खरेदी भ्रष्टाचार प्रकरण चांगलंच गाजत होतं अशा राजेवाडी विभागात डेप्युटेशनवर पाठवलं...
सीमा : चला तर मग राजेवाडी विभागात!

(पार्श्वभूमीवर लावणीचा हलकासा आवाज. राजेवाडी विभागातील एका सहकारी दूधसंघाचं कार्यालय. संचालक मंडळ ‘बुगडीची लावणी’ घोळून घोळून म्हणत एन्जॉय करत आहेत. एकजण "चेरमनसाहेब आले, चेरमनसाहेब आले" अशी वर्दी देत येतो. एकदम शांतता होते. चेअरमन बाळासाहेब खिलारे - पाटील येतात.)

बाळासाहेब : (येत हात जोडून) रामराम मंडळी!

एक : (ॲलर्ट होत) राम राम चेरमनसाहेब, रामराम... येवस्थित चाललंय नव्हं समदं?

सर्व : जी, व्हय व्हय!

बाळासाहेब : काही अडचण?

दोन : नाय...काय नाय!

तीन : आपण असताना कसली अडचण येणार?

चार : उशीर झाला म्हणायचा येण्यासाठी!

बाळासाहेब : रातच्याला दीड वाजेपतूर चालला नवीन दूध सोसायटीच्या उद्घाटनाचा कार्यक्रम. रेष्ट पन झाली नाय आमची येवस्थित. आता पुन्ना दौऱ्यावर निघायचंय मुंबैला. शेमसाहेबांनी बोलीवलंय. शब्द दिलाता म्हून आलो हिकडं.

पाच : शेमसाहेबांनी बोलीवलंय म्हणजे मंत्रिमंडळाचं रि-शफल होणार म्हणा की !

बाळासाहेब : (त्याला टाळी देत) त्याला येळ हाय अजून. सरकारी दूध योजनांचं सहकारीकरण करून त्या दूधसंघाकडं हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव येतोय... चर्चेला बोलीवलंय.

एक : आसं व्हय?

बाळासाहेब : सरकारी यंत्रणा इरोधात हाय सगळी. अशा टायमाला आपली केस स्ट्राँग करून सपोर्ट करायला नको का शेमसायबांना आपण? एकदा का सरकारी दूधयोजनांचं सहकारी दूध संघात रुपांतर झालं की कसा विकास होतो राज्याचा बघा मग...

दोन : हो हो, बरोबर !

बाळासाहेब : आले का आपले नवे म्यॅनेजर?

तीन : व्हय व्हय. बसल्याती भाईर...

बाळासाहेब : काय नाव त्यांचं?

चार : पटवर्धन.

बाळासाहेब : ऑ?

चार : सुधीर पटवर्धन.

बाळासाहेब : हां, हां... बोलवा की त्याना! (तो विंगेत पळतो. ते इतराना–) काय असंल ते आत्ताच इचारुन घ्या, पारखून घ्या माणूस आगदी. पसंद नाय पडला तर परत पाठवू, मागनं भानगड नको, समजलं का मालक? (सर्वजण "व्हय व्हय, हो हो" करतात,)

सुधीर : (येत) येऊ का? नमस्कार.

बाळासाहेब : राम राम! या. या आशेऽऽऽ. बसा हिकडं. गूड–गूड! आमी बाळासाहेब खिलारे-पाटील, चेरमन!

सुधीर : हो. आय नो. माहिती घेतली मी आपल्याविषयी!

बाळासाहेब : ( हस्तांदोलन करत ) व्हेरी हॅपी टू सी यू हियर. आमीच सांगिटलं व्हतं शेमना की एखांदा एफिशंट आधिकारी पाठवा हिकडं म्हनून. तुमी नवीन तंत्रज्ञानवाले काय म्हणतात ते- हां, आय.टी.मधले एक्सपर्ट!
सुधीर : आता स्वत:लाच काय एक्सपर्ट म्हणू शकत नाही मी, थोडं कळतं त्यातलं... म्हणजे बी. एस्सी. आय. टी. पण झालंय माझं इतकंच...
बाळासाहेब : व्हेरीगूड, व्हेरीगूड! हिकडं रग्गड काम करायचं आता. खानं - पिनं चेपून करायचं. काय अडचन आसली तं मोकळ्या मनानं सांगायची, रात्र- बेरात्र काही फरक मानायचा नाय. हे गाव आपलं मानायचं, घरात असल्यागत राह्याचं. काय समजलं?
सुधीर : हो... येस. अगदी नक्की! थँक्यू!
बाळासाहेब : आमचं एक स्वप्न हाय मालक.
सुधीर : कसलं स्वप्न?
बाळासाहेब : आपल्या ह्या दूधसंघाची किर्ती समद्या जगात झाली पायजे. त्यासाठी अशी वेबसाईट सुरु करायची की जगात कुठं बी बटन दाबलं की, काम्प्युटरमधनं दुधाची धार लागली पाहिजे,च्या मायला, काय? (सर्व फुटल्यागत हसतात. तो अवघडलेला. नकळत सारे जणू त्याचा इंटर्व्ह्यू सुरू करतात–)
बाळासाहेब : वंगाळ मानू नका. इंटर्व्ह्यू म्हणून नाय पन सहज माहिती म्हणून इचारतो–
सुधीर : (सावध होतो) विचारा की काय ते!
बाळासाहेब : 'दूध सुरू व्हन्याच्या टायमाला गुरांना कोनता रोग होण्याची शक्यता असते?
सुधीर : (एकदम यांत्रिकपणे) रक्तातील कॅल्शियमचे, विशेषतः आयनीभूत झालेल्या, म्हणजेच विद्युतभारित अणू वा रेणू या स्वरुपात रुपांतरित झालेल्या कॅल्शियमचे प्रमाण कमी झाल्यामुळे दूध सुरू होताना गुरांना हायपोकॅल्शिमिया नावाचा रोग होण्याची शक्यता असते. (शांतता)
बाळासाहेब : इक्त यवस्थित कठीन बोलताय तुमी, आधी मंत्रालयात जी. आर. काढायचं काम करीत व्हता का काय? (मोठ्यानं हसतात. इतर त्याना साथ देतात, एका संचालकाला निर्देश करत) इचारा तुमी.
एक : दुधातलं फॅट शोधण्याची पद्धत कधी सुरु झाली?
सुधीर : अमेरिकन शास्त्रज्ञ स्टिफन बॅबकॉक यांनी १८९० मध्ये ती पद्धत शोधून काढली.
बाळासाहेब : शेब्बास! व्हेरीगूड. (दुसऱ्याला) इचारा तुमी– गो अहेड.
दोन : (कठीण प्रश्न विचारल्याच्या आविर्भावात) आपल्याकडच्या म्हशी माजावर कवा येत्यात सांगा बरं? (स्वत: मोठ्यानं हसत शेजाऱ्याकडून टाळी घेतो.)
सुधीर : (गंभीरपणे) साधारणपणे सप्टेंबर ते फेब्रुवारी या काळात म्हशी माजावर येतात आणि त्यामुळेच सुमारे सत्तर टक्के म्हशी ऑगस्ट ते नोव्हेंबर या काळात वितात.
बाळासाहेब : अरं वा, लय चांगला आभ्यास दिसतोय की तुमचा प्राण्यांच्या प्रसुतीशास्त्राचा. (आणखी एकाला) इच्यारा तुमी!
तीन : गायीला आपण गोमाता मानतो मग बैलाला बाप का मानत न्हायी सांगा बरं! (त्यांच्यासोबत इतरही हसतात)
सुधीर : मुळात 'गो' हा शब्द संस्कृत असून गाय आणि बैल या दोघानाही उद्देशून तो वापरला जातो. शिवाय बैलालाही आपण आपल्या संस्कृतीत शक्तीचं, समृद्धीचं आणि पौरुषाचं प्रतीक मानलेलं आहे.
चार : बाऽऽऽ रं...आपन अनेक गोष्टी निर्यात करतो पन दूध निर्यात का करू शकत न्हायी ते सांगा बरं!

सुधीर : कारण अगदी उघड आहे. आपल्या दुधात इतकी भेसळ असते की बाहेरच्या देशात त्याचा एक थेंबसुद्धा कोणी पिऊ शकणार नाही.
बाळासाहेब : म्हणजे बाहेरच्या देशात दुधात पाणी मिसळत नाहीत असं म्हनायचंय का तुम्हाला?
सुधीर : अर्थातच! त्याबाबतीत मोनापोली आहे आपली.  (बाळासाहेब एकदम उकळी फुटल्यासागत तर इतर त्यांच्यामागून शिष्टाचार म्हणून हसतात.)
बाळासाहेब : मग ह्यावर काय उपाययोजना करणार तुम्ही?
सुधीर : (स्पष्टपणे) पहिलं काम म्हणजे आपल्या सगळ्या दूध सोसायट्यांचं इन्स्पेक्शन करणं!
दोन/तीन : (चमकून) आँ?
सुधीर : आपला दूधसंघ तोट्यात का हे आधी समजून घेतलं पाहिजे असं अगदी स्पष्ट मत आहे माझं. पहिल्यांदा आर्थिक शिस्त लागली पाहिजे आपल्याला. ती लागली की गाडी आपोआप रुळावर येईल.
(संघर्ष सूचित करणारं क्षणभराचं संगीत.)
बाळासाहेब : (धोरणीपणानं) बरंऽऽऽ... म्हाराष्ट्राने संपूर्ण जगाला कॉपरेशनचा आदर्श घालून दिलाय, ही सहकारी चळवळ आणखी मजबूत करण्यासाठी काय करावं लागंल
आपल्याला सांगा बरं?
सुधीर : आपल्याकडची सहकारी चळवळ कधीकाळी आदर्श होती हे खरं पण खरं तर ती आता तशी राहिलेली नाही. आता तिची 'राजकीय सहकारी चळवळ' झालीय अगदी. स्पष्टपणेच बोलायचं तर 'राजकारण अधिक भ्रष्टाचार बरोबर सहकार' असं नवीन समीकरण तयार झालंय हल्ली. ते बदलायला हवं आधी.
चार : या म्हणण्याला काय अर्थ हाय?
सुधीर : काय चुकीचं बोलतोय मी? लोकाना सहकाराचं खरंखुरं शिक्षण देण्याची गरज निर्माण झालीय आता. आपण इतके साखर कारखाने काढले, दूधसंघ काढले, सूत गिरण्या, पतपेढ्या काढल्या पण सहकाराचं शिक्षण देणारी एकतरी शाळा, कॉलेज, विद्यापीठ काढलं का?
(सर्वजण निरुत्तर.)
पाच : (काही क्षणानी पुढाकार घेत एक संचालक) एक रेडा किती म्हशीना गाभण करु शकतो सांगा बर? (सर्वजण एकमेकाना टाळ्या देत मोठमोठ्यानं हसतात.)
सुधीर : (गंभीरपणे) रेड्याच्या एका स्खलनामध्ये साधारणपणे दोनशे कोटी शुक्राणू असतात, त्यातून साठ म्हशीना गर्भधारणा होऊ शकते.
बाळासाहेब : (आव्हान स्वीकारल्याच्या आविर्भावात) लयीच स्मार्ट दिसत्यात आपले नवे म्यॅनेजर पन आता बघा कसं त्येंचं तोंड बंद व्हतंय ते! (चालीवर गात)
अरं सवाल करतो जवाब द्यावा,
सोडीव माझा गुंता रंऽऽऽ
सरसावून मी उभा राहिलो,
आतुर झाली जनता रंऽऽऽ...
अरं तुझ्या अकलेची घेतो कसोटी,
हुमान घालतो खरोखरी

चालतं फिरतं देऊळ कंचं दर्शन देतंय घरोघरी?
("जी ही ही हे जिरं रं ऽऽऽ" अशी झील धरत सगळे बाळासाहेबांना साथ देतात. सगळे उत्तरासाठी सुधीरकडे पहात आहेत)
सुधीर : (प्रेक्षकांना) मंडळी, सिनेमा हे मनोरंजनाबरोबरच ज्ञानाचंही साधन कसं आहे, याची जाणीव मला आयुष्यात पहिल्यांदाच झाली. 'सांगते ऐका' हा पिक्चर बघितला असल्यामुळं बाळासाहेबांच्या प्रश्नाचं उत्तर मी लगेच देऊ शकलो. (ठसक्यात गात)
अरं तेहेतीस कोटी देव नांदती, गोमातेच्या पोटी रं
असं गायीचं देऊळ फिरतं,
गोष्ट नव्हं ही खोटी रं ऽऽऽ
हे हे हे हे हे हे हेऽऽऽ
(बाळासाहेबांसहीत सर्वजण उत्स्फूर्तपणे दाद देत "जीरं रामा दाजीऽऽऽ " अशी झील धरत, धमाल गाऊ-नाचू लागतात. अंधार.)

अंक पहिला / प्रवेश तिसरा

(हळू हळू प्रकाश. एका दूधसोसायटीचं कार्यालय. कर्मचारी पत्ते खेळत आहेत. रंगलेल्या डावातील एक उत्तेजक क्षण. आरडाओरडा, वादावादी, हास्य-विनोद. सुधीर येतो. त्याच्यासोबत एक असिस्टंट. 'मॅनेजरसाहेब आले, मॅनेजरसाहेब आले' असा गलका होतो. सगळे उठून उभे राहतात, नमस्कार करतात.)
सुधीर : हेड अकाऊंटंट सोनवणे कोण आहे इथं?
सोनावणे : नमस्कार सर, मी सोनवणे.
सुधीर : काय चाललंय काय हे, ऑफिसात पत्ते खेळताय? (कमालीची शांतता)
सोनवणे : सॉरी सर.
सुधीर : अशानं दूधसंघ तोट्यात जाणार नाही तर काय फायद्यात येईल? (शांतता.)
सुधीर : जरा तुमचं ॲडव्हान्स रजिस्टर घ्या बरं इकडं. (सोनवणे देतो. ते चाळत-) चेअरमन आणि संचालकानी उचललेल्या ॲडव्हान्सची रक्कम बावीस लाख रूपये?
सोनवणे : (निरूत्तर)
सुधीर : महिन्याला सरासरी दीड लाखाचा ॲडव्हान्स?
सोनवणे : हो साहेब, आता एवढा मोठा संघ म्हणजे...
सुधीर : एकेकाला पाच-पाच, सहा-सहा वेळेला ॲडव्हान्स दिलेला दिसतोय, बरोबर?
सोनवणे : हो साहेब,
सुधीर : वसुली किती केली?
सोनवणे : (गप्प)
सुधीर : बोला लवकर.
(सोनवणे गप्पच)

सुधीर : आधीची परतफेड झाली नाही तर नवा ॲडव्हान्स देता येत नाही हा साधा नियम माहीत नाही तुम्हाला?

सोनवणे : माहीत आहे साहेब.

सुधीर : मग एकेकाला पाच-पाच सहा-सहा वेळा कसा काय दिला तुम्ही?

सोनवणे : (निरुत्तर.)

सुधीर : बोला की, चेअरमन आणि संचालकांसाठी वेगळे नियम आहेत का? इकडं गरीब कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार नाही आणि इकडं लाखा-लाखांचे ॲडव्हान्सेस?

सोनवणे : साहेब आम्ही लहान माणसं. चेरमनसाहेबाच्या पुढं बोलायचं म्हंजे...

सुधीर : इथं लहानमोठेपणाचा काय संबंध? तुम्हाला नेमलंय ते चेअरमनची मर्जी सांभाळण्यासाठी नाही तर नियमांचं पालन करण्यासाठी! ते नियमाबाहेर जात असतील तर त्याना नियम सांगणं तुमचं काम नाही का?

सोनवणे : (निरुत्तर)

सुधीर : कॅशबुक घ्या जरा इकडं. (एकजण आणतो, ते चाळत) गावात चामुंडेश्वरीचा यज्ञ झाला, किती तूप विकलं त्यासाठी?

सोनवणे : दीड टन.

सुधीर : काय भाव लावलाय?

सोनवणे : (रजिस्टरमध्ये डोकावत) पस्तीस रुपये.

सुधीर : बाहेर किलोचा भाव ऐंशी रुपये असताना दीड टन तूप तुम्ही पस्तीस रुपयांनी विकलं! ह्या एका छोट्याशा व्यवहारात पस्तीस ते चाळीस हजारांचा घोटाळा केलाय तुम्ही, येतंय का लक्षात?

सोनवणे : आम्ही काय करणार साहेब, चेरमनसाहेबांचा निर्णय–

सुधीर : पण त्यासाठी संचालक मंडळाची बैठक बोलावली होती का तुम्ही?

सोनवणे : आम्ही कोण सांगणार साहेब त्यांना?

सुधीर : तुम्ही सांगू शकत नाही कारण तुम्हीपण सामील आहात या व्यवहारात. उंदराला मांजर साक्षी!

सोनवणे : कसं सांगावं तुम्हाला?

सुधीर : एक लेमनराव पाटील सोडले तर बाळासाहेबांच्या विरोधात बोलायची हिंमत नाही कुणाची.

सोनवणे : पण सा-

सुधीर : वेळ आली तर तुम्ही तोंडघशी पडाल सोनवणे, बाळासाहेब सहीसलामत सुटतील... यामागचं कारस्थान लक्षात घ्या तुम्ही!

सोनवणे : (गप्प.)

सुधीर : (पुढची पानं चाळत) मारुतीचे स्पेअरपार्टस् कशासाठी खरेदी केले?

सोनवणे : (मान खाली घालतो)

सुधीर : दातखिळी कशानं बसली तुमची? संघाकडे एकही मारुती गाडी नसताना मारुतीचे स्पेअरपार्ट्स कशासाठी खरेदी केले?

सोनवणे : (गप्पच)

सुधीर : मला समजलंय सगळं...बाळासाहेबांचा मेव्हणा आणि तुमच्या इतर नातेवाईकांच्या गाड्या आपल्या गॅरेजमध्ये दुरुस्त होतात की नाही?

सोनवणे : (हतबल) हो साहेब...
सुधीर : स्पेअरपार्ट्सची खरेदीसुद्धा एकाच दुकानातून, तीही त्यांच्याच नातेवाईकांच्या? पन्नासहजार रुपयांच्या वर खरेदी असेल तर त्यासाठी टेंडर मागवावं लागतं हे माहीत नाही तुम्हाला?
सोनवणे : (गप्प)
सुधीर : किती हिस्सा मिळतो तुम्हाला सांगा?
सोनवणे : (गप्प)
सुधीर : (मुद्दा बदलत) 'पशुखाद्य निमिर्ती' आणि 'गवत खरेदीची फाईल काढा बरं...
सोनवणे : त्या फायली साहेबांच्या घरी आहेत साहेब.
सुधीर : ऑफिसचं रेकॉर्ड घरी? कुणाची नोकरी करताय तुम्ही, दूधसंघाची का बाळासाहेबांची?
सोनवणे : स– सा...
सुधीर : 'कॅन खरेदी भ्रष्टाचार प्रकरणा'तली कागदपत्रं आणा. बघायचीत मला सगळी...
सोनवणे : ते रेकॉर्ड सापडत नाही साहेब.
सुधीर : मला असली उत्तरं दिलेली आवडत नाहीत सोनवणे. जेवढं रेकॉर्ड असेल तेवढं दाखवा मला.
सोनवणे : (गप्प)
सुधीर : गप्प का बसलात वाचा गेल्यासारखे? (दमत घेत) हे बघा, तुम्हाला एकदाच सांगून ठेवतो... मला खोटं बोललेलं अजिबात आवडत नाही. समजलं?
सोनवणे : हो साहेब. जेवढी कागदपत्रं मिळतील तेवढी काढून ठेवतो, वेळ द्या थोडा.
सुधीर : (शांत होत) ठीक आहे, दोन दिवस देतो मी तुम्हाला. (सर्वांना) आणि हे बघा, तुम्ही काही शत्रू नाही माझे. साऱ्यांनी मिळून एकत्र काम करायचंय आपण, नियमांचं पालन करायचंय. लोकांच्या पैशाचे ट्रस्टी आहोत आपण, त्यांनी आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवायचाय. त्यासाठीच पगार मिळतो आपल्याला हे लक्षात घ्या! काय?(उठत) चला...
सोनवणे : लगेच निघलात साहेब, अजून चहा-पाणीसुद्धा झालं नाही.
सुधीर : चहापाणी घेत बसलं तर काम कोण करणार? रोज दोन म्हटलं तरी सहा महिने सोसायट्यांच्या इन्स्पेक्शनमध्येच जातील माझे.
सोनवणे : म्हणजे सगळ्या सोसायट्यांचं इन्स्पेक्शन करताय तुम्ही?
सुधीर : हो, का?
सोनवणे : आता कोणत्या सोसायटीत निघालाय?
सुधीर : दुसरी कोणती? ‘नरवीर’– आपल्या चेअरमनची!
सोनवणे : (घाबरून) पण, साहेब...
सुधीर : मी कुणालाही घाबरत नाही. आणखी एक...
सोनवणे : काय साहेब?
सुधीर : सिक्युरिटी ऑफिसरला पत्र द्या, आत्ताच्या आत्ता!
सोनवणे : कसलं साहेब?
सुधीर : येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक गाडीचं गेटवर चेकिंग झालं पाहिजे, मग ती चेअरमनची असो वा मंत्र्याची...

सोनवणे : (स्तंभित होऊन) बरं साहेब ....
सुधीर : (आवेशात) पाण्यानं भरलेले कॅन आत कसे येतात आणि तुपानं भरलेले बाहेर कसे जातात ते बघतोच मी आता! (वातावरणात एक प्रकारचा थरार. संघर्ष सूचित करणारं संगीत. अंधार.)

अंक पहिला / प्रवेश चौथा

(हलगी कडाडण्याचा आवाज. प्रकाश. नरवीर दूध सोसायटीचे प्रांगण. विंगेतून लेझीमचा ताफा पुढे येतो. त्या दूधसोसायटीचा तरुण चेअरमन झुंजुर्डे-पाटील सुधीरला एस्कॉर्ट करीत पुढे आणतो आणि हात वर करुन सर्वांना शांत करतो.)
झुंजुर्डे : (ओळख करून देत) नमस्कार साहेब! मी झुंजुर्डे - पाटील. 'नरवीर दूध सोसायटी'चा चेअरमन.
सुधीर : नमस्कार!
झुंजुर्डे : बाळासाहेबांबरोबर दिल्लीला गेल्तो; रात्री परत आलो तर तुम्ही इन्स्पेक्शनला येणार असा निरोप! यावं लागलं काय करणार? ( सुधीरच्या कानाजवळ जात खाजगी सुरात) विधान परिषदेवर घेण्याचं चाललंय मला.
सुधीर : (त्याच्या म्हणण्याला किंमत न देता) आपल्याला भेटून फार आनंद झाला. पण हा काय प्रकार आहे, मिरवणूक काय, ताशे-वाजंत्री काय?
झुंजुर्डे : तुमच्या स्वागतासाठी, दुसरं काय? तुम्ही पहिल्यांदाच आलात आमच्या गावात, जनाची नाय तर मनाचीतरी बाळगायला नको का?
सुधीर : अहो पण मी काही कोणी मंत्री किंवा पुढारी नाही, आणि मी आलोय ते केवळ माझं कर्तव्य करण्यासाठी, पगार मिळतो मला या कामाचा.
झुंजुर्डे : तुमी जसं तुमचं कर्तव्य करता तसं आमी आमचं करतो. (" घ्या ते इकडं" असं एका कार्यकर्त्याला म्हणतो. तो कार्यकर्ता पुष्पहार पुढे करतो. झुंजुर्डे तो सुधीरला बळेबळे घालून भाषण सुरु करतो. समोरचे कार्यकर्ते आता प्रेक्षक झालेले-) बंधूंनो, आपल्या दूधसंघाला पटवर्धन सायबांच्या रुपानं एक तरुण आणि तडफदार अधिकारी मिळालेला हाय. (टाळ्या) आज पहिल्यांदाच ते आपल्या सोसायटीला भेट द्यायला आलेले आहेत आणि म्हणूनच आपन त्यांच्या स्वागताचा कार्यक्रम घेतलेला हाय. (एका कार्यकर्त्याला 'घ्या ते हिकडं' अशा सूचना देत शाल, श्रीफळ या क्रमाने त्या वस्तू बळेबळे त्याच्यावर लादतो. या प्रकाराने तो चांगलाच वैतागलेला.)
सुधीर : अहो, काय चाललंय काय तुमचं हे? बंद करा बघू आधी. मी इथं आलोय ते तुमच्या सोसायटीचं कामकाज पहाण्यासाठी. तुमच्या ह्या खुषामतीत अडकणारा माणूस नाही मी, हे लक्षात घ्या!
झुंजुर्डे : शांत व्हा साहेब, शांत व्हा. तुमाला सोसायटीचं काय इन्स्पेक्शन करायचंय ते खुश्शाल करा पन जनरीत सांभाळली पाहिजे का नको आमाला?
सुधीर : कसली जनरीत आलीय त्यात?
झुंजुर्डे : आपण पहिल्यांदाच आलात आमच्याकडं, ते बी इतक्या लांबनं. मुद्दाम पायधूळ झाडलीत आमच्या सोसायटीत. तुमचं नीट स्वागत करायला नको का आम्ही? आमचा ऐका! आधी चांगला आराम करा, रेस्टहाऊसवर येवस्था केलीय समदी. गरीबाचा पाहुणचार घ्या, शबरीची आंबट बोरं गोड मानून घ्या साहेब. आणि हो तुम्ही शाकाहारी की मांसाहारी?

सुधीर : (चिडून) अहो काय चाललंय हे;  लक्षात येत नाही माझ्या. हा सगळा प्रकार बंद करा आणि मला दूध संकलनाचं रजिस्टर तेवढं दाखवा म्हणजे झालं.
झुंजुर्डे : बरं... तुम्ही म्हणाल तसं होऊ दे. (अनिच्छेने एकाला 'घ्या ते इकडं' म्हणतो. एकजण रजिस्टर देतो. ते त्याच्यासमोर धरत) बघा साहेब काय बघायचं ते?
सुधीर : (रजिस्टर घेत उत्साहाने) रोजचं सरासरी किती संकलन आहे?
झुंजुर्डे : पाच हजार लिटर.
सुधीर : (रजिस्टरमधील नोंद पहात) पण आजतर फक्त दोनच हजार आलेलं दिसतंय.
झुंजुर्डे : चालू हाय आजून. संध्याकाळपर्यंत जाईल पाच हजारावर.
सुधीर : (घड्याळ पहात) म्हणजे आता तास दोन तासात तीन हजार लिटर दूध येईल असं म्हणायचंय का तुम्हाला?
झुंजुर्डे : (थोडासा संतापत) म्हणजे आमी बनवाबनवी करतोय असं म्हणायचंय का तुम्हाला?
सुधीर : म्हणायचं कशाला? ते दिसतंय की इथं. गावात सोसायट्या किती?
झुंजुर्डे : दोन सायेब.
सुधीर : आणि दुभती जनावरं किती?
झुंजुर्डे : साहेब, आमच्याकडनं माहिती घेण्याआधीच आमाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करताय तुमी.
एक : नाय तं काय!
दोन : बाळासाहेब उजवा हात मानत्यात झुंजुर्डे-पाटलांना. परिषदेवर गेले की मंत्रीबी व्हत्याल झटक्यात.
तीन : येत्या अधिवेशनात मंत्री म्हणून बसत्यात बघा!
सुधीर : अशा दडपणाचा इथं काहीही फायदा होणार नाही. गावातली दुभत्या जनावरांची संख्या लक्षात घेतली तर एक हजार लिटर दूध जायला हवं इथनं. तेवढं दोन सोसायट्यातून गेलं म्हणजे प्रत्येकाच्या वाट्याला पाच-पाचशे लीटर आलं. हजार-पाचशेचा फरक समजू शकतो मी. पण पाच हजार लिटर जाईलच कसं काय?
झुंजुर्डे : हे बघा, आमी खरं बोलायला काय घाबरत नाही साहेब. स्पष्टच सांगायचं तर थोडीफार ॲडजेस्टमेंट ही करावीच लागती आम्हाला.
सुधीर : ॲडजेस्टमेंट?
झुंजुर्डे : आता काय खुळ्यागत करताय राव. (समजावून देत) एक हजार लिटर चांगलं दूध आलं तर त्यात शे-दीडशे लिटर पाणी घालून ते वाढवायचं. दर मात्र चांगल्याच दुधाचा लावायचा. या पद्धतीनं जिल्ह्यात दररोज पंचवीस हजार लिटर पाणी दुधात मिसळलं गेलं तर दोन ते अडीच लाख रूपयांना मरण नाही.
सुधीर : किती सहजगत्या बोलताय हो तुम्ही. आपण काही चूक करतोय असं वाटतंच नाही तुम्हाला. इथं येण्याच्या आधी लेमनराव पाटलांची सोसायटी बघीतली काल. तिथं काही असला प्रकार चालत नाही...
झुंजुर्डे : त्या लेमनरावाचं काही सांगू नका आम्हाला, एक नंबरचा चमचा आहे तो सरकारचा!
सुधीर : मी वार्निंग देतोय तुम्हाला! तुमची ही ॲडजेस्टमेंट यापुढं खपवून घेतली जाणार नाही. वेळ आली तर हे सगळं प्रकरण बाहेर काढीन मी आणि मग त्यात खालपासून वरपर्यंत कुणीही सुटणार नाही हे लक्षात ठेवा!
झुंजुर्डे : (चिडून) हे बघा साहेब, आजपर्यंत आमाला वार्निंग देण्याची कुणाची हिंमत झाली नव्हती, माणूसकी सोडायची नाही अशी शिकवण हाय बाळासाहेबांची म्हणून–
सुधीर : म्हणजे हे सगळं बाळासाहेबांनी करायला सांगितलंय तर तुम्हाला?

झंजुर्डे : अहो, कसं सांगायचं तुम्हाला? राजकारण करायचं म्हणजे काही गोष्टी कराव्याच लागतात की!
सुधीर : पण त्यासाठी शासनाची फसवणूक करताय तुम्ही?
झंजुर्डे : (आविर्भावात) स्पष्टपणे सांगा साहेब किती घेणार?
सुधीर : काय किती घेणार?
झंजुर्डे : दुसरं काय साहेब? (पैशाची ॲक्शन करुन) हप्ता!
बोला, किती ठरवायचा?
सुधीर : (गंमतीने) याबाबत 'जनरीत' काय आहे तुमची?
झंजुर्डे : तुमच्या तोंडानी आकडा सांगा, नंतर कटकट नको.
सुधीर : तुम्हाला काय वाटतं, सगळीच माणसं पैशानं विकत घेता येतात?
झंजुर्डे : (सहकाऱ्यांना) ‘मी नाय बाय त्यातली, अन लाव कडी आतली...’ (सगळे हसतात)
एक : पैसा नको असंल तर ऱ्हायलं! तुमी म्हणाल तर कपडे, भांडी, धान्य,भाजीपाला घरपोच रवाना करू. दिवाळीत 'कुकिंग रेंज' किंवा 'फूड प्रोसेसर' पाठवू घरी, वैनींना भेट म्हणून. तुमच्या आधीच्या साहेबांची हीच रीत होती.
दोन : फार मोठ्या मनाचा माणूस व्हता त्यो !
सुधीर : तुम्हाला एक संधी देऊन चूक करत होतो मी. आता तुमच्या सोसायटीला कुलुप लावणं हेच योग्य होईल या निर्णयाला आलोय मी.
झंजुर्डे : कशाला नसत्या वल्गना करताय साहेब. मंत्रीमंडळाचं रि-शफल होणार हाय लवकरच. सांगितलं ना आत्ताच बाळासायबांचा नंबर लागतोय त्यात. आन् त्याना खातं मिळणार हाय तेसुद्धा दुग्धव्यवसाय... आयुष्याची नासाडी करून घेऊ नका साहेब. भवितव्याचा इचार करा. बाळासाहेबांकडं पुन्हा हे खातं आलं की एका म्हैन्याच्या आत प्रमोशन द्यायला लावतो तुमाला बोला है तयारी?
सुधीर : म्हणजे मी काय करायचं नेमकं?
तीन : काहीही करायचं नाही!
सुधीर : आँ?
चार : (हसत) आता तुमी हे जे काय करताय ते बंद करायचं आन् आधीच्या सायबागत गप घरी बसून पगार घ्यायचा.
सुधीर : आणि जर मी तुमचं ऐकलं नाही तर?
झंजुर्डे : तर आमी काय करणार साहेब?(कार्यकर्त्यांचं नियंत्रण सुटत आहे. त्यांना रोखत) हात जोडतो साहेब पण उगा नको त्या मार्गाला जायला लावू नका. इनाकारण काट्याचा नायटा करु नका. काय घोडं मारलंय आमी तुमचं? जगाला जे पटतंय तेच करतोय ना आम्ही? मग कशाला उगा आड येता? थोडंफार इकडं-तिकडं केल्याशिवाय जगता येईल का माणसाला आजच्या जमान्यात, सांगा बरं?
सुधीर : काही इकडं-तिकडं करण्याची गरज नाही. जबाबदारीनं आणि निष्ठेनं जगायला शिकलं पाहिजे आपण. हा देश ज्यांनी स्वतंत्र केला... (कार्यकर्ते पुढे त्याला बोलू न देता घेरतात. एकजण त्याची कॉलर पकडून 'मायला सुक्काळीचा' म्हणत त्याच्या थोबाडीत मारतो. दुसरा 'लय माजलाय साला' म्हणत त्याच्या पोटात ढोपर मारतो.)
सुधीर : अरे काय करताय हे? काय चाललंय काय? काय घोडं मारलंय मी तुमचं? अशा तऱ्हेनं बळाचा वापर करून विचारांशी मुकाबला करु शकत नाही तुम्ही.

एक : साळत पाठांतर केलेला सुविचार ऐकवतोय भडवा.
दोन : सुविचार खाऊन पोट भरतं काय रे सुक्काळीच्या!
तीन : बायकोचं कुक्कू पुसून आल्याला दिसतोय रांड्या.
(दुसरा त्याला खाली पाडून त्याच्या मांडीवर पाय देऊन दुसरा पाय हातात घेऊन त्याला जणू फाडण्याच्या तयारीनं, थंड धारदार सुरात) तंगडं काढू का हात काढू बोल? का दोन्ही उपसू एकदमच कोंबड्यागत?
सुधीर : (शांतपणे) भल्या माणसा, मरणाला घाबरत नाही मी. पण मला मारल्यामुळं सत्य दडपलं जाईल असं वाटतं का तुम्हाला? आज ना उद्या लोकाना समजणारच हे. (पेचात पकडत) आणि मला मारल्याचं प्रकरण बाळासाहेबांच्या प्रतिमेशी जोडलं जाईल हे लक्षात येतंय का तुमच्या? सार्वजनिक जीवन अडचणीत येईल त्यांचं. म्हणजे एका अर्थानं बाळासाहेबांऐवजी मलाच मदत करताय तुम्ही...
चार : (त्याचा पाय सोडून देत) चॅयला, हे टकुऱ्यातच नाय आलं बघा आपल्या. काय नामी डोस्कं हाय भडव्याचं! (पायातली वहाण काढून उगारत) इतकी बुध्या हाय तर चांगला वापर का न्हाय करत तिचा, व्हय रे भाड्या?
सुधीर : चांगला वापर करायचा म्हणजे काय करायचं मी?
एक : (मारत) डोस्क्याचा गेम न्हाय करायचा आमच्याशी.
दोन : (मारत) दूधसंघाच्या राजकारणात पडायचं न्हाय.
तीन : सारखं भ्रष्टाचार, भ्रष्टाचार, कॅन खरेदी भ्रष्टाचार आसं बोंबलत फिरायचं न्हाय.
सुधीर : (उपरोधानं) आणि दुधात पाणी घाल म्हटलं की घालायचं, बरोबर ना?
चार : (ख़ुशीनं) आता कसं?
पाच : (सुरात) घाल म्हटलं की?
सुधीर : घालायचंऽऽऽ
पाच : घाल म्हटलं कीऽऽऽ?
सुधीर : घालायचंऽऽऽ
('नाच ग घुमा'च्या तालावर, " घाल रे पाणी..." सुरू होतं.
तो त्यांना विरोध करत आहे आणि ते त्याला उचलून नाचवत मांजर उंदराला जसे छळते तसा त्याचा छळ करत आहेत. हे दहशतीचं नृत्य काही क्षण सुरू राहत. तो असहाय. अंधार.)

अंक पहिला / प्रवेश पाचवा

(प्रकाश. भाजीबाजार. सीमा भाजी घेण्यासाठी आलेली आहे. लोकांची गर्दी. त्यांची गडबड. पेपर विकणारा पोऱ्या एका बाजूने ओरडत येतो आणि दुसरीकडे निघून जातो.
"आजची ताजी बातमी, दूधसंघाच्या मॅनेजरला मारहाण... बाळासाहेबांच्या राजीनाम्याची मागणी, दुधातल्या भेसळीचे भयंकर प्रकरण, लेमनराव पाटलांचे धरणे, खास अग्रलेख वाचा, दूध की विष? आजची ताजी बातमी... "
सीमा : (भाजीवाल्याला) कोबी कशी दिली मामा?
मामा : अडीच रुपये पाव.
सीमा : टॉमेटो?

मामा : पाच रुपये...

सीमा : काय पाव?

मामा : नाय तं मग काय किलुचा भाव सांगिटला का ताई?

सीमा : रामा रामा रामा रामा काय ही महागाई ! जगायचं तरी कसं म्हणता मामा?

(त्यांचा हा व्यवहार सुरु असताना चार-पाच धटिंगण तिथं येऊन उभे राहतात. भीतीदायक संगीत. तिथं चाललेल्या व्यवहारात ते आगाऊपणे रस घेऊ लागतात. एकजण कचकचून शीळ घालतो. )

मामा : आता ताईसायेब, तुमी नोकरदार मान्संच आसं रडाया लागलात तर आमच्यासारख्या गरिबानं कसं जगावं? हातावरचं पोट आस्तया आमचं... (संगीताची तीव्रता वाढते. काहीतरी त्रासदायक घडणार याची चाहुल लागल्याप्रमाणे ती सावध होते. तरीही नेटाने)

सीमा : पण वीस रुपये किलो टॉमॅटो म्हणजे फारच जास्त वाटतात, जरा कमी करा की.

मामा : आसं करा ताईसाब, साडेचारनी घ्या. फकस्त आठ आन्यावर धंदा हाय आमचा, कसं म्हन्ता?

सीमा : चार रुपायांनी देणार असाल तर घेते, नाहीतर चालले.

मामा : बरं घ्या चला, कशाला इनाकारण वचवच करताय. घ्या ती थैली हिकडं.. (तो पिशवीत टॉमॅटो टाकतो. ती पैसे देते. पिशवी घेऊन निघते. संगीत. ते तिचा पाठलाग करतात. ती रस्ता बदलते. तेही बदलतात. ती कावरीबावरी होते पण धीर सोडत नाही. एका कोपऱ्यात ते तिला गाठतात. एकजण शिट्टी मारतो. दुसरा, तिसरा, चौथा ढुंगण हलवून नाचत, वाकुल्या दाखवू लागतात.)

सीमा : कोण आहात तुम्ही? रस्ता सोडा, का अडवताय मला? व्हा बाजूला मुकाट्यानं...

पहिला : डोस्क्याचा चांगला वापर केलास तर वीस रुपये किलो टमाटे महाग वाटणार नायत तुला.

सीमा : कसला डोक्याचा वापर?

दुसरा : तुझ्या त्या इमानदार दादल्याला मदत म्हणून तूबी 'धंदा' सुरु केलास तर सहा महिन्यात लखपती व्हशील.

सीमा : (सुटकेसाठी मार्ग शोधत) शी: काय बेशरम आहेस रे तू. (तो लोचट हसतो) हे बघा, असली-तसली बाई नाही मी. पोलिसात कंप्लेंट करीन. तुरुंगात जाल खडी फोडायला.

तिसरा : मस्ती बघा सालीला किती हाय ती.

सीमा : कुणाला मला मस्ती आलेय- मला? तुम्ही तुमच्या आई-बहिणींशी वागाल का रे असे? वागाल?

चौथा : (तिचा दंड पकडून तिला आपल्याजवळ ओढत) लय पोपटावानी बोलतीस की ग रांडं... माज उतरू का तुझा चांगला?

सीमा : सोड, सोड मला. नालायक, नीच (तडफडते) काय गुन्हा केलाय आम्ही कुणाचा?

पाचवा : (दमात घेत) तुझ्या दादल्याला सांग, दूधसंघाच्या राजकारणात पडायचं न्हाय. आंगावर ट्रक घालून मारू भडव्याला. आन् तुला बी नागवी करुन धींड काढू तुझी गावातनं... ( तिला ढकलून देतो. ती कोलमडते. सावरते. उठते. ते दहशत निर्माण करत निघून जातात.)

सीमा : (तिचा एकदम उद्रेक.) अंगात किडे पडतील तुमच्या, वाट्टोळं होईल सगळ्यांचं, टाचा घासून मराल, जिवंतपणी नरकात जाल हलकटानो. माझा शाप आहे तुम्हाला. (अंधार)

अंक पहिला / प्रवेश सहावा.

(घर. सीमा सुधीरचं अंग शेकवत आहे. तो 'आई गऽऽऽ आई आई' करत विव्हळतोय. ती शहाणी. निर्विकार.)
सुधीर : काय ग, काय झालं? मार मला बसलाय अन् चेहरा तुझा का पडलाय?
सीमा : तुम्ही माझं ऐकाल का?
सुधीर : काय?
सीमा : हे सोसायट्यांचं इन्स्पेक्शन बंद करा आधी.
सुधीर : लोकांच्या धमक्याना कधीपासून घाबरायला लागलीस?
सीमा : धमक्याना घाबरत नाही मी पण वाट्टेल त्या थराला जाण्याची तयारी आहे त्यांची.
सुधीर : अगं पण आपण गप्प बसलो तर भ्रष्टाचार हीच योग्य जीवनपद्धती आहे असं धरून चालणार नाही नवी पिढी?
सीमा : नव्या पिढीच्या कल्याणाची जबाबदारी आपल्यावरच आहे असं समजू नका.
सुधीर : कुणीतरी येऊन आपल्याला सांगेल याची वाट बघत बसावं, असं म्हणायचंय का तुला?
सीमा : मला एवढंच म्हणायचंय की तुमची जी लढाई आहे ती फक्त तुल्यबळ माणसांशीच करा म्हणजे झालं. बिनडोक माणसांच्या नादाला लागण्यात अर्थ नाही.
सुधीर : सगळ्याच सोसायट्यातले लोक काही खुनशी आणि गुंडगिरी करणारे आहेत असं समजू नको. सोसायटी कशी असावी याचा आदर्श नमुना, लेमनरावांच्या सोसायटीत बघायला मिळला. दुधाच्या धंद्यावर अनेक बेकार तरुणाना उभं केलंय त्यानी. आदर्श म्हणून नावारूपाला आलंय त्यांचं गाव. मी कौतुक केलं तर म्हणाले की, 'सहकाराचा चमत्कार आहे हा '
सीमा : पण आपल्याला त्याचा काय उपयोग?
सुधीर : बाळासाहेबाना आणि त्यांच्या चमच्यांना घाबरायची गरज नाही, आम्ही तुमच्या मागे आहोत असं म्हणाले...
सीमा : खरंच असं म्हणाले ते?
सुधीर : म्हणजे काय? अगदी तुझ्या गळ्याची शपथ. अगं चांगल्या माणसांना जगात तोटा नसतो कधी ...
(त्याचं वाक्य पूर्ण करत) फक्त ती संघटित नसतात इतकंच.
आता कसं? (दोघेही मोकळेपणानं हसतात.)
सुधीर : लेमनरावानी एक नवीनच भानगड सांगितली.
सीमा : कसली भानगड?
सुधीर : ते बाळासाहेबांचे कट्टर विरोधक. त्यामुळं त्यांच्या सोसायटीनं कितीही चांगलं दूध घातलं तरी त्यांना भाव मात्र कमीच मिळतो.
सीमा : हे कसं काय शक्य होईल?
सुधीर : दुधातली पाण्याची भेसळ ओळखण्यासाठी लॅक्टोमीटर असतो ना?
बरोबर!
सुधीर : त्या लॅक्टोमीटरमध्येच काहीतरी काळंबेरं असावं असा संशय आहे त्यांचा. म्हणाले की, 'चारित्र्यवान माणसानं कसं जगावं हल्लीच्या जमान्यात कळंना गेलंय. '
सीमा : रामा रामा रामा रामा. पण याचा बाळासाहेबाना काय फायदा?

सुधीर : अशा अनेक सोसायट्या आहेत की त्या चांगलं दूध घालतात. ते चांगलं दूध शेवटी दूधसंघात आल्यानंतर पाणी घालणाऱ्या सोसायट्यांच्या दुधात मिसळलं जातं आणि शुद्ध म्हणून बिनबोभाट पुढं पाठवलं जातं. कुणाला काही संशयसुद्धा येत नाही. म्हणजे एखाद्या हुशार विद्यार्थ्याच्या पेपरची कॉपी करुन 'ढ' विद्यार्थी देखील चांगल्या गुणानी पास होतो ना तसाच प्रकार झाला हा!

सीमा : आता आलं लक्षात.

सुधीर : पंचामृत माहीत आहे का तुला?

सीमा : पंचामृत? कुठं सत्यनारायणाच्या पूजेला-बिजेला गेला होतात की काय?

सुधीर : अगं ते पंचामृत नाही म्हणत मी.

सीमा : मग?

सुधीर : साखर, सोडा, युरिया, फॉरमॅलिन आणि बेन्झाईक ॲसीड यांचं मिश्रण.

सीमा : अगं बाई! या मिश्रणाचा उपयोग काय बॉम्ब वगैरे तयार करण्यासाठी करतात की काय?

सुधीर : त्याहीपेक्षा भयंकर कारणासाठी वापर केला जातोय त्याचा.

सीमा : म्हणजे?

सुधीर : ते दुधात टाकलं की दूध घट्ट होतं. शास्त्रीय भाषेत दुधाचा एस.एन.एफ. वाढतो– सॉलीड नॉट फॅट. पंचामृत हा कोडवर्ड आहे त्याचा.

सीमा : अहो पण हे लक्षात येत नाही लोकांच्या?

सुधीर : लोकांना काय पण आमच्या तज्ज्ञांनासुद्धा कळत नाही ते.

सीमा : खरंच काय अफलातून माणसं आहेत हो ही.

सुधीर : काहीजणानी तर आणखी एक शक्कल लढवलेय. सीमा : कोणती?

सुधीर : अफुमारीचा पाला!

सीमा : काय, काय, काय?

सुधीर : अफुमारीचा पाला! मराठवाड्याकडं जंगलात अफुमारी नावाचं एक झाड असतं, त्याच्या पानांचा रस काढून दूधात टाकला तरी ते घट्ट होतं.

सीमा : शपथ घ्या माझी.

सुधीर : अगं मी खोटं कशाला बोलू? काहीजण वडाच्या झाडाचा चीकंही मिसळतात.

सीमा: (डोळे विस्फारत) वडाच्या झाडाचा चिक? सिंदबादच्या सफरीतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी सांगताय तुम्ही मला.

सुधीर : नितीमत्तेला घरात यायचं असेल तर दरवाजातून सन्मानपूर्वक आत यावं लागतं अनिती मात्र खिडकीतून, कौलारातून, झरोक्यातून, न्हाणीघरावरच्या जाळीतून जिथे जिथे तिला फटी दिसतील तिथून तिथून आत घुसते आणि संपूर्ण घर व्यापून टाकते.

सीमा : तुम्ही हे जे बेन्झाईक ॲसीड वगैरे म्हणताय त्यामुळे त्रास होत नाही का लोकाना?

सुधीर : होतो, पण तो दुधामुळे होतोय हे लक्षातच येत नाही त्यांच्या. दुधाच्या रुपानं रोज विष पितोय आपण. दवाखान्यात लोकांच्या रांगाच्या रांगा लागलेल्या दिसतात त्या कशामुळं? (उद्रेकानं) ज्या कॅनमधनं आपल्यापर्यंत दूध पोहोचतं त्यातले बरेच गळके असतात. त्याना आतल्या बाजूने चिखल किंवा साबणाचा लेप लावलेला असतो.

त्यातले जंतू आपल्या पोटात जातात. बर्फाच्या व्यापाऱ्याना फायदा मिळावा म्हणून कॅनमध्ये आत कोनाच्या बाजूला नको तेवढा बर्फ मारला जातो...  दरवर्षी विधीमंडळापर्यंत चर्चा होते यावर, पण काय निष्पन्न होतं त्यातनं शेवटी?
सीमा : तेच म्हणतेय मी तुम्हाला. कुठवर पुरे पडणार आपण त्यांना?
सुधीर : सत्ता आणि संपत्तीच्या मेंदूनं जगतात हे लोक!
सीमा : तुम्ही कितीही म्हटलंत तरी विचारांचा मुकाबला विचारानं करणं शक्य होईल का त्यांना?
सुधीर : मी एक प्रयत्न करून बघणार आहे.
सीमा : कसला प्रयत्न?
सुधीर : बाळासाहेबांना भेटून समक्षच बोलतो त्यांच्याशी. तसा त्यांचाही निरोप आलेला आहे परवा.
सीमा : तुम्हाला कितीही सांगितलं तरी ऐकणार नाही तुम्ही. जीवाला जपा म्हणजे झालं.
सुधीर : तू काळजी करू नको. भ्रष्टाचारी माणसं कितीही धोकेबाज असली तरी ती सज्जन माणसाला ती वचकून असतात हे लक्षात ठेव. (हसतो. अंधार)

अंक पहिला / प्रवेश सातवा.

(प्रकाश. बाळासाहेबांचे घर. ते पेपर वाचत बसलेले.)
सुधीर : (येत) नमस्कार सर, येऊ का?
बाळासाहेब : या की या, वेलकम वेलकम!
सुधीर : आपला निरोप मिळाला.
बाळासाहेब : हो. हो. मुद्दामच बोलावलं तुम्हाला,
सुधीर : बोला...
बाळासाहेब : तसं काय स्पेश्यल कारण नव्हतं म्हना, पन तुमची कामाची पद्धत आवडली आपल्याला. आय मष्ट आडमिट दॅट. तशी शिस्तीची थोडीफार गरज आमालाबी व्हतीच की, काय? कॉन्ग्रेच्युलेशन्स.
सुधीर : तुम्ही हे मनापासून बोलत असाल...
बाळासाहेब ह: आता मनापास्नं नाय तं काय मालक? एकदम होलहार्टेडली... तुमी आमच्या गाडीला गेटपास सुरु केला, आमी काय बोललो का? आमच्या गाड्यांची गॅरेजमधली दुरुस्ती बंद केली, आमी काय बोललो का? आमची रिकव्हरी काढली, आम्ही काय बोललो का?
सुधीर : माझा त्या मागचा-
बाळासाहेब : हेतू चांगला व्हता. आमची काहीएक कम्प्लेंट नाय. तुमी स्वताच्या फायद्यासाठी केल्या नाय ह्या सुधारना. त्यांचा फायदा दूधसंघालाच मिळनार हाय. तुमचं काय म्हनतात ते? (आठवत) हां 'विशाल द्रष्टीकोन' समोर ठिवून केलं तुमी हे समदं.
सुधीर : तुम्हाला काही त्रास–
बाळासाहेब : हात्तेच्यायला, त्रास देन्याचा तुमचा हेतू व्हता आसं कंचा सुक्काळीचा म्हनतुया? उलट, तुम्हालाच मारहाण झाली, ताईसाहेबांना धमक्या गेल्या. आय मस्ट शे सॉरी फॉर दॅट. आमच्या लोकांना अक्कल न्हाय, हेच खरं.

सुधीर : दुधातल्या पाण्याच्या भ्रष्टाचाराविषयी काही म्हणायचंय का तुम्हाला?
बाळासाहेब : (काय मूर्ख माणूस आहे हा अशा अर्थी हसत) अहो हाताची पाची बोटं सारखी आसत्यात का कवा?
सुधीर : अपवादात्मक परिस्थिती असती तर सोडून दिलं असतं पण सगळेच भेसळ करताहेत, त्याचं काय?
बाळासाहेब : तुमचं शिकलेल्या लोकांचं हेच चुकतं बघा. एकदम उठायचं आन् समोर दिसंल त्याला मागचा पुढचा विचार न करता एकदम फासावर चढवून मोकळं व्हयाचं.
सुधीर : म्हणजे?
बाळासाहेब : आहो रामाबरूबर जशी शीता, इठ्ठलाबरूबर जशी रुख्माय तसंच दुधाबरूबर पानी. मिल्क विदाऊट वॉटर इज जष्ट ॲन इंपॉशीबल थिंग, आय टेल यू!
सुधीर : म्हणजे दुधात पाणी मिसळण्याच्या प्रकाराला तुम्ही उघडपणे मान्यता दिलीय असं समजायचं?
बाळासाहेब : आता हाय का? आहो शेतकऱ्याच्या धार्मिक भावना गुतलेल्या असत्यात त्येच्यात. बिनपाण्याचं, कोरं दूध आकाशाला दावलं तर कास नासतिया गायी-म्हशींची आशी समजूत हाय त्यांची, म्हून टाकावेच लागतात चार शितोडे, हाय काय त्यात? (हसतात) तुमी स्वता दूध काढलंय का कधी, सांगा काढलंय ? आचळावर हे असं पाणी मारल्याबगर पान्हाच सोडत न्हायीत बघा ढोरं. उगा आपलं खुळ्यागत इनिस्पेक्शन करीत बसलासा. तुमच्यासारख्या हुशार मानसानं आपली बुध्या चांगल्या कामात खर्ची घालावी आशी आपेक्षा हाय आमची. म्हणून वेबसाईटच्या कामात लक्ष घाला म्हनलं म्या तुमाला.
सुधीर : आपली वेबसाईट सुरू करायची म्हणजे भ्रष्टाचाराचा व्हायरस जगभर पाठवायचा असंच की नाही?
बाळासाहेब : (मोठ्यानं हसतात) दुधात पानी मिसळलं म्हजी भ्रष्टाचार झाला व्हय? ही तुमची डेफिनिशन भ्रष्टाचाराची... तुमी आसं करा मालक, वरचा पैसा खर्च न करता एखादं काम करून दाखवता का? लायनीत उभं राहून तिकिटं घिऊन या शिनेमाची, नायतर आसं करा एखाद्या डॉक्टरकडं जाऊन आजारपनाचा दाखला आना, नायतर पोलिसस्टेशनात जाऊन चोरीची कंप्लेट करून या, नाहीच जमलं तर मामलेदार कचेरीत जाऊन बिनशेतीची परमीशन घेऊन या, नायतर तलाठ्याकडं जाऊन रेशनकार्ड काढून आणा... जावा...हात्त्यावरनं मिरवणूक काढतो तुमची! भ्रष्टाचार म्हने (हसतात) आता मिळत्यात चार पैशे म्हणून कोनी मिसळलं दुधात पानी, अर्जंट कामं व्हावी म्हणून दिली कुनाला चिरीमिरी तर लगी काय भ्रष्टाचार झाला म्हणायचा का? देवालासुदिक प्रसन्न करून घ्यायचं आसंल तर काहीतरी द्यावंच लागतं की. काय म्हंतात ते - (आठवत) हां... 'पत्रम् पुष्पम् फलम् तोयम् यमे भक्त्या...' गीता वाचलीय का न्हाय तुमी? (हसतो) काळ किती बदललाय याची आयड्या न्हाय तुमाला. ह्या बरूबर तुमच्या त्या मूल्याबिल्यांच्या डेफिनिशन्स बदलल्या नाहीत ना तर त्याबी मोडून पडत्याल, आन् तुमीबी मोडून पडाल.... लोक म्हनत्याल, 'खूळ लागलंय ह्याला...'
सुधीर : मला काही फरक पडत नाही त्यांनं!
बाळासाहेब : राजकारनात आसल्यामुळं आनेक गोष्टी कराव्या लागत्यात आमास्नी... कुठं भूकंप झाला नायतर महापूर आला तर आमीच धावून जातो सरकारच्या मदतीला आधी! राजकारणातली एक आडजेस्टमेंट आसती ती आमची! आडजेस्टमेंट कसली, इनव्हेस्टमेंटच म्हणायची. बियाणंच पेरलं नाय तर धान्य कशाला उगवतंय बोंबलायला? पण आमची ही व्हिजन लक्षात घेत नाय तुम्ही... लगीच आमी भ्रष्टाचारी!

सुधीर : तुम्ही ॲडजेस्टमेंट करता म्हणजे काय करता? नकळत भ्रष्टाचारालाच खतपाणी घालता ना? त्याऐवजी चुकीच्या गोष्टीचा तिथच्या तिथं प्रतिकार का करीत नाही? उद्या तुमच्या घरात साप शिरला तर त्याचं डोकं ठेचून काढणार की त्याला गोंजारत बसणार?

बाळासाहेब : सापाचं डोस्कं ठेचायचं झालं तर त्यासाठी आधी आपलं डोस्क ठिकान्यावर ठेवावं लागतं मालक.

सुधीर : पण अनिष्ठ प्रथांना संरक्षण देणं म्हणजे त्यांचा प्रसार करण्यासारखंच असतं, हे लक्षात का घेत नाही तुम्ही?

बाळासाहेब : म्या कुठं नाय म्हनलं? माजं म्हननं एवढंच हाय की जुन्या गोष्टींच्या–

सुधीर : डेफिनेशन्स् बदलायला हव्यात.

बाळासाहेब : (खुशीनं) आंग आश्शीऽऽऽ!

सुधीर : आणि तुमच्या सोयीच्या रुढ करायला हव्यात...

बाळासाहेब : माझी कशाची सोय तिच्यायला? तुमी ज्याला भ्रष्टाचार म्हनता त्यो जिथं नाय आशी एक जागा दाखवा मला. शो मी अ शिंगल प्लेस... आपलं न्हाऊद्या जगात काय चाललंय बघा. भ्रष्टाचार जितका मोठा तितकी कामं पटापट व्हत्यात, फायली पटापट हलत्यात. भ्रष्टाचार जितका जास्त तितका तो देश पुढं जातो. 'भ्रष्टाचार बंद, कामं ठप्प' अमेरिका, जपान, फ्रान्स ह्या मोठ्या देशात काय चाललंय? तिथं भ्रष्टाचार न्हायी आसं म्हनायचंय तुमाला? म्या दोनदा दौरा केलाय ह्या देशांचा.

सुधीर : तुम्ही ही जी उदाहरणं देताय त्या भौतिक जगाच्या बाहेर सुख, समाधान, सत्य नावाच्या काही गोष्टी असतात, ज्याना आपण जीवनमूल्ये म्हणतो. त्यांचा वेध घेण्याइतकी 'व्हिजन' जर तुमच्यात नसेल तर स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणवून घेण्याची योग्यता नाही तुमची.

बाळासाहेब : (चिडत) कुणाकडं हाय आशी व्हिजन? एकतरी माणूस दाखवा मला... इतरांच बाजूला ठेवू. न्हेरूंचं उदाहरन घेऊ. एवढा मोठा मानूस पन त्यानं भ्रष्टाचारी मित्राना पाठीशी घातलंच का न्हाई शेवटी?

सुधीर : म्हणजे नेहरूंच्यात तुम्हाला जे दिसलं ते हे एवढंच!

बाळासाहेब : पन ते म्हत्त्वाचं नाय का?

सुधीर : म्हणजे तुम्हाला म्हणायचंय की भ्रष्टाचाराला सार्वजनिक संमती देण्याची वेळ आलेली आहे?

बाळासाहेब : येळ आल्याली हाय? येवून गेली! तुमी ज्याला भ्रष्टाचार म्हणता त्यो माझ्या दृष्टीनं भ्रष्टाचारच नव्हं. पैशे खाणं यात कसला आलाय भ्रष्टाचार, पैशे घेऊनसुद्धा काम न करणं हा भ्रष्टाचार! (मोठ्यानं हसतात.)

सुधीर : पैशाचं बाजूला ठेवू... तुम्ही तुमच्या किती नातेवाईकांना दूधसंघात लावलं याची यादी देऊ का? कॅन खरेदी भ्रष्टाचार प्रकरणातली सगळी कागदपत्रं तुम्ही अधिकाऱ्यांशी संगनमत करून नाहीशी केलीत. अधिकाऱ्यांवर दडपण आणून आपल्या सोयीप्रमाणे कामं करून घ्यायची याला भ्रष्टाचार म्हणणार नाही तुम्ही?

बाळासाहेब : म्हजी अधिकारी तेवढे चांगले आन् पुढारी तेवढे नालायक, आसंच का न्हायी? सोलापूरला तुमच्या एका डेपुटी कमिशनरच्या मुलीचं लग्नं झालं. तिथं लोकाना पिन्यासाठी पानी म्हनून पाश्चराईज्ड पाण्याचे टँकर पाठवले व्हते त्यानं. सरकारी यंत्रणेचा आसा दुरुपयोग झालेला कुठं बघिटला व्हता का तुमी?

सुधीर : मी नाही कुठं म्हणतोय, पण अधिकाऱ्यांना बिघडवण्याचं काम पुढाऱ्यांनीच केलंय हे लक्षात घ्या. ज्या क्षणी मंत्र्यानी प्रशासनात हस्तक्षेप सुरु केला तेव्हापासून हा सगळा घोळ सुरु झालेला आहे.

बाळासाहेब : प्रशासनात हस्तक्षेप करण्याची येळ तुमी आणली. लोकांचं कल्याण ऱ्हायलं बाजूला आन् जो तो हानत सुटला पोट फुटस्तर... आन एक लक्षात घ्या, राज्य हे काय मंत्र्यांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या मर्जीवर चालत न्हायी, ते चालतं कायद्याच्या आधारावर.
सुधीर : इथंच तर खरी मेख आहे.
बाळासाहेब : मेख?
सुधीर : कायदे कोण करतं, तुम्हीच ना? कायदे जितके अधिक तितका भ्रष्टाचाराला वाव अधिक हेही चांगलं माहिताय तुम्हाला. म्हणजे कायदेपण तुम्हीच करायचे, आणि त्यातल्या पळवाटाही तुम्हीच शोधून काढायच्या. (उपरोधानं) व्वा!
बाळासाहेब : (नमतं घेत) दुधात पानी घालायचं बंद झालं की समदीकडं रामराज्य येईल असा दावा हाय का तुमचा?
सुधीर : निदान त्याची सुरुवात तरी होईल.
बाळासाहेब : बाऽऽऽरं, उद्यापासनं दूधातलं पाणी बंद ! आमी आर्डर दिल्यावर एक थेंबसुद्धा पाणी घालणार नाही कोणी. पण एक ध्यानात घ्या. खाली आपटलेला चेंडू जसा उसळी मारून पुन्हा वर येतो तशी रिॲक्शन येईल बघा. भ्रष्टाचाराच्या नव्या वाटा शोधून काढत्याल लोक. उगा क्रांती - बिंतीच्या फंद्यात न पडता समद्यांशी मिळून-मिसळून वागण्यातच भलं हाय तुमचं. आभाळंच फाटलंय त्याला कुठं कुठं ठिगळ लावत बसणार, मालक? 'खूळ लागलय याला' असं म्हणून फेकून देत्याल तुमाला. जुन्या नोटा यवहारात नव्या नोटाना हाकलून लावतात का नाही तसं. (आठवत) काय म्हणतात ते.. हां... बॅड मनी आलवेज ड्राइव्हज् आऊट गूड मनी- काय? (लयीत म्हणू लागतात)
नव्या नोटीला हाकलून लावती
जुनी फाटकी नोटं
इथं आंधळं दळतंय कुत्रं खातंय पीठंऽऽऽ
(इतर संचालक विंगेतून बाहेर येऊन 'आंधळं दळतंय, कुत्रं खातंय पीठं' ही ओळ पालुपदासारखी म्हणत गाण्यात सहभागी होतात.)
सर्व : आंधळं दळतंय कुत्रं खातंय पीठंऽऽऽ...
बाळासाहेब : नव्या युगाची ओळख पैसा
इतर : ओळख पैसाऽऽ
बाळासाहेब : नव्या युगाचे धोरण पैसा
इतर : धोरण पैसाऽऽऽ
बाळासाहेब : चोरी करा वा डाका घाला करा खून बिनधास्त
इतर : आंधळं दळतंय कुत्रं खातंय पीठंऽऽऽ
(उपरोक्त पद्धतीनेच उर्वरित गाणं म्हटलं जातं)
: पोटावरती देई पाय,
तोच खात्रीने वरती जाय
शहाणा येथे वेडा ठरतो,
वेडा खातोय 'स्वीट'
आंधळं दळतंय कुत्रं खातंय पीठंऽऽऽ

: सत्य, अहिंसा, मूल्ये निती,
हाती असावी चर्चेपुरती
व्यवहारामधी दुर्गुण सगळे,
होऊन फिरती धीट
आंधळं दळतंय कुत्रं खातंय पीठंऽऽऽ

: मिळून-मिसळून राहू सारे,
चोर- शिपाई भेद नको रे
ॲडजेस्टमेंटचे गाऊ गाणे,
हातात घालून हातऽऽऽ
आंधळं दळतंय कुत्रं खातंय पीठंऽऽऽ
आंधळं दळतंय कुत्रं खातंय पीठंऽऽऽ

(सगळेजण फेर धरून त्याच्या भोवती गाणे म्हणत असतानाच हळूहळू पडदा.)

**मध्यंतर**

***

(या नाटकाची पूर्ण संहिता ज्यांना हवी असेल त्यांनी नमूद पत्त्यावर लेखकाशी संपर्क साधावा.

या नाटकाचे प्रयोग, भाषांतर-रूपांतर, त्यावर आधारित चित्रमालिका, चित्रपट, टेलिफिल्म यासारख्या अन्य माध्यमातील रुपांतरासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. या नाटकातील कोणताही भाग, मुद्रित वा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमात कोणत्याही पद्धतीने वापरावयाचा झाल्यास त्यासाठीही लेखकाची पूर्व-परवानगी घ्यावी.)

***